**पोलीस उप-अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा**

सिटी सर्व्हे नं.५२४ ,

जिल्हा न्यायालयासमोर, सदर बझार, कॅम्प सातारा

**प्रेसनोट दि.२१/०७/२०२५**

| | | |
|---|---|---|
| १. | ला.प्र.वि कार्यालय | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा |
| २. | आरोपीतांची नावे | शरण देवीसिंग पावरा वय-४३ वर्षे, नोकरी – विस्तार अधिकारी, पंचायत समिती, खटाव (वडूज), वर्ग -३ मुळ रा.- मु.पो.अंबापूर ता शाहदा, जि.-नंदुरबार. सध्या रा. डंगारे पेट्रोलपंप शेजारी, शिवाजी नगर, दहिवडी ता.-माण जि.सातारा. |
| ३. | पडताळणी व सापळा दिनांक | दि.२१/०७/२०२५ रोजी |
| ४. | मागणी केलेली लाचेची रक्कम | १०,०००/- रुपये |
| ५. | स्वीकारलेली लाच रक्कम | ५,०००/- रुपये (लाच रक्कमेपैकी पहीला हप्ता – ५,०००/- रुपये) |
| ६. | हस्तगत रक्कम | ५,०००/- रुपये |
| ७. | हकीकत | तक्रारदार यांची पत्नीचे नावे प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) सन २०२४-२०२५ या कालावधीतील मौजे पुसेसावळी येथे घरकुल मंजूर झाले होते. सदर घरकुलाचा हप्ता आरोपी लोकसेवक शरण देवीसिंग पावरा वय-४३ वर्षे, नोकरी – विस्तार अधिकारी सांख्यिकी, पंचायत समिती, खटाव (वडूज) यांनी रक्कम रूपये ७०,०००/- मंजूर करून दिला म्हणून तसेच यानंतरचे देखील घरकुलाचे हप्ते मंजूर करून देण्यासाठी तक्रारदार यांना एकूण १०,०००/- रूपये लाचेची मागणी केली. त्यापैकी ५०००/- रूपये पहिला हप्ता आज रोजी व उर्वरीत ५०००/- रूपये लाच रक्कम पुढील आठवड्यात देण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे आज रोजी लाच रक्कमेतील पहिला हप्ता रक्कम रूपये ५०००/- पंचायत समिती , खटाव (वडूज) या कार्यालयात आरोपी लोकसेवक याने स्विकारताना त्यास ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचेविरुद्ध वडुज पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रीया चालु आहे. |
| ८. | सापळा पथक | श्री. सचिन राऊत, पोलीस निरीक्षक<br>श्री. गणेश ताटे पो. हवा , श्री.सत्यम थोरात पो कॉ.,श्री.अजयराज देशमुख |
| ९. | तपासी अधिकारी | श्री. सचिन राऊत, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा |
| १० | परिवेक्षण अधिकारी | श्री राजेश वसंत वाघमारे, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा |
| ११ | मार्गदर्शन अधिकारी | श्री शिरीष सरदेशपांडे पोलीस अधीक्षक ला.प्र.वि पुणे परिक्षेत्र<br>श्री विजय चौधरी अपर पोलीस अधीक्षक ला.प्र.वि पुणे परिक्षेत्र |

नागरिकांना आवाहन करणेत येते कि, लाच मागणी संबंधाने तक्रार असल्यास पोलीस उप-अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा यांचे कार्यालय सिटी सर्व्हे नं.५२४ ,जिल्हा न्यायालयासमोर, सदर बझार, कॅम्प सातारा यांचे खालील संकेत स्थळावर/ क्रमांकावर संपर्क साधावा.

१) मोबाईल अॅप – www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com- maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

४) कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२१६२/२३८१३९ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४

(राजेश वसंत वाघमारे)

पोलीस उप-अधीक्षक

.लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा.